**नि.फौ.प्र.क्र. ३०२६५६/२०११**
सरकार वि. दिनेश व इतर
**नि. क्र.८३**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची शपथेवर जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | गोपालक्रिष्ण बल्लीप्रसाद अग्रवाल |
| वय | : | ७८ वर्षे |
| व्यवसाय | : | सी.ए. |
| राहणार | : | २३७, बजाज नगर, नागपूर |

**<u>सरतपासणी– सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून</u>**

१. मला न्यायालयाचा समंस प्राप्त झाला व आज या प्रकरणात साक्ष देण्यास व्ही.सी.द्वारे झालो. मी गांधीनगर गृहनिर्माण सोसायटी येथे एक प्लॉट अंदाजे १५ वर्षापूर्वी विकत घेतला होता. नंतर मला असे माहित झाले होते की, मनोहर भट यांनी सदर प्लॉट इतर कुणालातरी विकला होता. मी सदरील प्लॉट अर्नेजा यांचेसह विकत घेतला होता. सदरील प्लॉट माझेच ताब्यात आहे, मी त्याचा टॅक्स भरत आहे.

**<u>उलटतपासणी – श्री. एम.बी.निलजकर वकील साहेब यांचे मार्फत आरोपी करीता</u>**

२. मनोहर भट यांनी सदरील प्लॉट कुणाला विकला त्याचे नांव मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, सीटी सर्वे रेकॉर्डवर प्लॉट आमचेच नावाने आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरील प्लॉट मी डॉ.अर्नेजा यांचे वडीलांचे मध्यस्तीने घेतला होता. मी गांधीनगर सोसायटीमध्ये उपरोक्त खरेदीबाबत तक्रार दिली होती किंवा नाही याबाबत मला आता आठवत नाही. पोलीसांनी माझा जबाब कधी व केव्हा नोंदविला होता याबाबत मला आठवत नाही. मी स्वतः अधिवक्ता श्री.अनवाने यांचेकडे गेलो नव्हतो. पोलीसांनी मला आरोपींच्या ओळखपरेड करीता पोलीस स्टेशनला बोलविले नव्हते. मी भट यांनी केलेला करारनामा स्वतः बघीतला नव्हता. हे म्हणणे

खरे नाही की, मनोहर भट यांनी मी वर नमुद केल्याप्रमाणे कोणताही करारनामा केला नव्हता व सदरील प्लॉट विकला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपासणी –काही नाही**.

**श्रवणोत्तर स्वीकृत** **माझे समक्ष,**

स्वा/–
**( एस. एस. बोस )**
दिनांकः–१२.०३.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर